053

8.

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

...क सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

9.

1. राज्य State महाराष्ट्र ... जिल्हा District बृहन्मुंबई पोलीस ठाणे Police Station लाप्रवि पहिली खबर क्र. FIR No. 21 वर्ष Year 2026 दिनांक Date 28/07/26

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. 1988 चे ... कलमे Sections 7, 12 10.

(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : गुरुवार Day 22/07/26 तारीख पासून Date from ........ वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to 28/07/26 वेळ Time 18:00 11.

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.०० 12.

(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 23/07/2026 वेळ Time 13:00 वा.

गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 5/26 तारीख Date 28/07/26 वेळ Time 07.45 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी ........ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. 18 Km. चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. आरे (मुंबई) 13.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name आरे यॉर्ड ठिकाणाचे नंबर No. if any मोहनदास गल्ली Ward गोखले रोड रस्त्याचे नाव Name of road आरे कॉलनी

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place हॉटेल गाव Village ओबेरॉय पोस्ट Post बाजूला तालुका Taluka ........ जिल्हा Dist. मुंबई राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name रेखा गोरोबा दुधभाते (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name गोरोबा दुधभाते

जन्म तारीख व वय Date of Birth and Age 39 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9322815251

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी

(g) धर्म Religion हिंदू ........ जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address पोलीस वसाहत गल्ली/सर्व्हे नं. Ward कॉलनी घर/नाव नं. House Name No. T 3/308 फोन/मो. नं. Phone No. 9322815251 पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........ 14

रस्त्याचे नाव Road कोले कल्याण जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place मुंबई गाव Village युनिव्हर्सिटी पोस्ट Post कुमार पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address मुंबई. 15

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

(1) संतोष सानु पाताडे वय 31 वर्षे रा. ठी. - साई श्रद्धा बिल्डिंग, रूम नं. 706 सिद्धार्थ नगर, रोड क्र.-4, गोरेगाव (प.) मुंबई.

(2) देवेंद्र चंद्रकांत आदवडकर वय - 52 वर्षे राही - बी/401, कळामाई हो. सोसा, तुरेल पाखाडी रोड, मालाड (प) मुंबई

फिर्याद

श्रीमती. रेखा गोरोबा दुधभाते वय 37 वर्षे, व्यवसाय - नोकरी (पोलीस निरीक्षक) कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई. रा.ठी.- पोलीस वसाहत कलिना, सी/3/304 कोळे कल्याण, मुंबई युनिव्हर्सिटी, मुंबई यांचा स्वतंत्र कागदावर घेण्यात आलेला जबाब ही गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात यावा.

समक्ष

(सुनिल हाडगडे)
सहायक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
बृहन्मुंबई विभाग, मुंबई.

फिर्याद दिनांक २७/०७/२०२६

श्रीमती रेखा गोरोबा दुधभाते वय ३९ वर्षे, धंदा : नोकरी (पोलीस निरीक्षक), कार्यालयाचा पत्ता : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, राठी : पोलीस नवीन वसाहत, कलिना, सांताक्रुझ पूर्व, मुंबई, मोबाईल क्र.९३२२८१५२५१

----------

मी वरील प्रमाणे असून, मागील १ वर्षांपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

मी दिनांक २३/०७/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्रमांक ५०/२०२६ मध्ये तपासी अधिकारी म्हणून माझी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. सुनिल हारुगडे यांची नेमणुक केल्याबाबत आदेश मिळाल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार मोहम्मद फारूक मोहम्मद सऊद खान यांचेकडे त्यांच्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. तेव्हा तक्रारदार मोहम्मद फारुक मोहम्मद सऊद खान, वय २८ वर्षे, रा ठी. जय हिंद एकता सेवा सोसायटी, आंबेडकर चौक, अंबुजवाडी, आझाद नगर, अब्दुल हमीद रोड, गल्ली नंबर ३, मालवणी गेट नंबर ८, मालाड (प), मुंबई ४०००९५. मोबाईल नं. ९७०२५९८४७३० यांची मारुती सुझुकी वॅगनार मोटार कार क्र. एम.एच. ४७ वी.एल. ९६७० ही मागील एक महिन्यापासुन त्यांचे ओळखीचे श्री. राजन शामनारायण मिश्रा यांना चालविण्याकरीता दिली होती. दिनांक १८/०७/२०२६ रोजी श्री. राजन शामनारायण मिश्रा यांनी तक्रारदार मोहम्मद फारुक मोहम्मद सऊद खान यांना सांगितले की, दिनांक १५/०७/२०२६ रोजी सदरची मोटार कार ही मानव वस्त बिल्डींगजवळ, कच्चा रोड, मालवणी मालाड (प), मुंबई याठिकाणी रोडच्या कडेला पार्क केली होती. त्यानंतर दुसऱ्यादिवशी राजन हे वर नमुद ठिकाणी गेले असता, त्यांना पार्क केलेली मोटार कार मिळुन आली नाही. श्री. राजन मिश्रा यांनी मोटार कारचा शोध घेतला असता त्यांना तेथील स्थानिक रहिवाशांकडून समजले की, कच्चा रोड, मालवणी येथे महानगरपालिकेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याकरीता महानगरपालिकेने कच्च्या रोडलगत पार्क केलेले सर्व मोटार वाहने टोईंग केलेल्या होत्या. त्यादरम्यान वर नमुद मोटार कार देखील महानगरपालिकेने टोईंग केली आहे. म्हणुन श्री. राजन मिश्रा हे दिनांक २२/०७/२०२६ रोजी आरे कॉलनी, गोरेगाव (पुर्व) येथील महानगरपालिकेच्या पार्कीजवळ गेले असता त्यांना सदरठिकाणी मोहम्मद फारुक मोहम्मद सऊद खान यांची मोटार कार दिसुन आली. त्यामुळे श्री. राजन मिश्रा यांनी तेथे कार्यरत असलेल्या कामगार श्री. संतोष यांचेकडे गाडीबाबत विचारणा केली असता, त्यांनी श्री. राजन मिश्रा यांना रुपये ११,७००/- रुपये एवढी रक्कम फाईन म्हणून भरुन गाडी घेवुन जाण्यास सांगितले. त्यावर श्री. राजन मिश्रा यांनी सदरची रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असता, त्यांनी श्री. राजन मिश्रा यांना रुपये १,०००/- कमी करुन एकुन १०,७००/- रुपयाची मागणी केली. श्री संतोष यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम रुपये १०,७००/- ही तक्रारदार यांना देण्याची इच्छा नसून एजंट विरुध्द कायदेशीर कारवाई व्हावी म्हणून त्यानी दिनांक २३/०७/२०२६ रोजी ला.प्र.वि.,मुंबई येथे लेखी तक्रार दिली आहे.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील पडताळणी कारवाईकरीता दोन शासकीय पंच नामे १) श्री. अक्षय अमित कुंडूर, वय ३३ वर्षे, व्यवसाय - भुकरमापक, उपअधिक्षक, भुमी अभिलेख, कार्यालय : मुंबई उपनगर बांद्रा, मुंबई व २) श्री. प्रताप निवृत्ती कांबळे, वय ३५ वर्षे, व्यवसाय - सहायक मोटार वाहन निरीक्षक कार्यालय : प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य), ताडदेव, मुंबई कार्यालय यांना उपलब्ध केले.

तक्रारदार मोहम्मद फारुक मोहम्मद सऊद खान यांचे तक्रारीस अनुसरुन दिनांक २३/०७/२०२६ रोजी पडताळणी कारवाईचे नियोजन केले. मी, तक्रारदार व दोन्ही पंच यांना घेवून कार्यालयातील पहिल्या मजल्यातील तांत्रिक शाखेत गेले व तेथील टेक्नीशीयन पो.ह. सचिन मठपती यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर १५.२६ वा. व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार मोहम्मद फारुक मोहम्मद सऊद खान हे खाजगी

इसमास भेटण्याकरीता त्यांच्या आरे कॉलनी, गोरेगाव पूर्व, मुंबई येथील गोरेगाव यार्ड मध्ये प्रत्यक्ष भेटण्यास गेले. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र. १ हे परत आले त्यावेळी तक्रारदार यांचेकडे झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली असता, आलोसे देवेंद्र चंद्रकांत बांदवडकर हयाने तक्रारदार यांना गाडी सोडविण्याकरीता रु. ११,५००/- इतक्या रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती रु. ७,०००/- इतकी रक्कमेची मागणी केली. यापेक्षा जास्त रक्कम कमी करावयाची असल्यास मालाड पश्चिम येथील बी.एम.सी कार्यालयातील पाचव्या मजल्यावरील मेंटनन्स विभागातील श्री. आनंद जाधव यांची भेट घेण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी श्री. देवेंद्र यांना अधिक विनंती केली असता, त्यांनी रु. ६,०००/- इतक्या रक्कमेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना नमुद रक्कमेची पावती मिळणार का? याबाबत विचारणा केली असता, याची पावती मिळणार नाही असे सांगीतले व पावती पाहिजे असल्यास रु. ११,७००/- इतकी रक्कम बीएमसी मध्ये भरावी लागेल असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी नमुद रक्कम ऑनलाईन भरायची का कॅशने भरायची? याबाबत विचारले असता, श्री. देवेंद्र यांनी नमुद रक्कम ही कॅशने भरण्यास सांगितले.असे सांगीतले असता, आम्ही सदरचे रेकॉर्डींग चालु करुन ऐकले असता त्यामध्ये **''तो फिर ऐसा नही होता ना राजा, मे भी नोकरी करता हू,.. वो सब पैसा बी.एम.सी. को जाता है, अपने को नही जाता है,.. नही, तू और दो दिन ले, मैं सात हजार हि लूंगा, तेरे को एक बार जबान दे दिया तो दे दिया मेंने,.. एक काम कर, तेरा चेहरा देख के मुझे ना ये हो रहा है, अब एक काम कर, तू छे हजार तू कही से जमा कर, भर दे और लेके जा गाडी, मेरे रिस्क पे दे दूंगा तेरे को बस,.. पावती नही मिलेगी, पावती तो ग्यारा सातसो कि कटेगी, पावती बनेगी तो,... इधर आयेगा तो कॅश हि देना पडेगा, ऑनलाईन का पैसा इधर नही है,.. कॅश लेके आ जाना छे हजार, कल गाडी लेके जाना, ठिक है'' असे संभाषण ऐकले.**

त्यानंतर शासकीय कर्मचारी श्री. आनंद जाधव यांची भेट घेवून पडताळणी करण्याची सर्वानुमते ठरले. परंतू शासकीय कामाची वेळ संपली असल्याने सदर दिवशीची कारवाई स्थगिती करण्यात आली व त्यानंतर मी, तक्रारदार, पंच व पथक असे लाप्रवि, मुंबई कार्यालयास परत आले त्यावेळी १८:२० वाजले होते. सदरचे कॉलवरील संभाषण हे मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पंचासमक्ष पोह. मठपती यांच्या मदतीने ध्वनीमुद्रीत केले आहे. तक्रारदार यांना तडजोडीअंती ६,०००/- इतक्या लाच रकमेची मागणी केल्याचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाले आहे.

दिनांक २३/०७/२०२६ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे दिनांक २४/०७/२०२६ रोजी लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता शासकीय कर्मचारी श्री. आनंद जाधव यांचे महानगर पालिका, बृहन्मुंबई विभाग, मुंबई येथे रवाना झालो. त्यावेळी १२:४५ वा होते. तसेच दिनांक २३/०७/२०२६ रोजीच्या पडताळणी क्र. ५०/२०२६ मध्ये वापरण्यात आलेले सॅनडिस्क कंपनीचे ८ जीबी क्षमतेचे कार्ड, त्यावर क्रमांक **5332DTCN806W** असे नमूद असलेले कार्ड पुन्हा वापरण्यात येणार असून त्यामध्ये दिनांक २३/०७/२०२६ रोजीच्या ०२ फाईल्स असल्याचे पंचाना दाखविण्यात आले. त्यानंतर पडताळणी पंचनाम्या कामी मी, सपोआ सूनिल हारुगडे, पचं क्र १ व पंच क्र २, पोहक्र. ०३.२११/ मठपती, तक्रारदार व इतर सापळा पथक असे शासकीय वाहनासह रवाना होवून लिंक रोड, मालाड पश्चिम, मुंबई येथे डिकेथलॉनजवळ पोहंचल्यावर मी पोलीस वाहन रस्त्याच्या कडेस थांबविण्यास सांगितले. त्यावेळी १४:०० वाजले होते.

तदनंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस व्हॉईस रेकॉर्डर लावून लोकसेवक श्री. आनंद जाधव यांना त्यांच्या कार्यालयात भेट घेण्यासाठी तक्रारदार यांना पंच क्र. १ यांचेसह जाण्यास सांगितले व मी व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन पोह मठपती यांना तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बाजूस लावण्यास सांगितले. त्यावेळी वेळ १६:२३ वा होते. सदर सुचनेवरुन तक्रारदार व पंच क्र. १ हे सदर ठिकाणावरुन रिक्षाने रवाना झाले. काही वेळाने १७:२१ वा तक्रारदार, पंच क्र. १ हे परत शासकीय वाहनात येवुन बसले. मी , पंच नं.२ यांचे समक्ष पंच न.०१ व तक्रारदार यांना सदर ठिकाणी काय घडले? याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगितले कि, श्री जाधव यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना **''देवेंद्र भाई ने मेरे पास क्यों भेजा है, मेरे पास काम करने की, ऑथिरीटी नही है,आपको चलन मिलेगा यहॉ से, उनको उसका रिसीट देने को बोलो, उस स्लिप से वो चलन मिलेगा तिसरे माले पे, फिर वो चलान लेके**

फिर निचे ग्राउन्ड फ्लोर पे पैसा भरो'' असे सांगीतले. सदरचे तक्रारदार व लोकसेवक यांच्यातील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण मी, सपोआ हारुगडे पंच कमांक ०२ यांनी ऐकले. त्यावरुन लोकसेवक व तक्रारदार यांच्यात पडताळणी दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये लोकसेवक श्री आनंद जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी न करता रितसर चलन भरुन त्याची रक्कम भरण्याबाबत सांगितलेचे समजले.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मित्राच्या मार्फतीने टोईंग केलेल्या मोटार वाहनाचे चलन भरण्याबाबत चौकशी केली असता नमूदचे चलन हे मालाड पश्चिम येथील मनपा कार्यालयात भरत नसल्याचे समजून आले. सदरबाबत तक्रारदार यांनी आम्हा पंचासमक्ष पोनि दुधभाते यांना सांगितले. त्यावर सदरबाबत पुन्हा खात्री करण्याकरीता लोकसेवक श्री आनंद जाधव यांची त्यांचे कार्यालयात जावून समक्ष भेट घेवून त्याबाबत सविस्तर विचारणा करण्याचे सर्वानुमते ठरवले.

तदनंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजुस व्हॉईस रेकॉर्डर लावून लोकसेवक श्री. आनंद जाधव यांना त्यांच्या कार्यालयात भेट घेण्यासाठी तक्रारदार यांना पंच क्र. १ यांचेसह जाण्यास सांगितले व मी व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन पोह मठपती यांना तक्रारदार यांच्या शर्टच्या आतील बाजूस लावण्यास सांगितले. त्यावेळी वेळ १८:२३ वा होते. सदर सुचनेवरुन तक्रारदार व पंच क्र. १ हे सदर ठिकाणावरुन रिक्षाने रवाना झाले.काही वेळाने १८:४४ वा तक्रारदार, पंच क्र. १ हे परत शासकीय वाहनात येवुन बसले. मी , पंच नं.२ यांचे समक्ष पंच न.०१ व तक्रारदार यांना सदर ठिकाणी 'काय घडले' याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगितले कि, तिसरे माले पे कोई नही है, असे विचारले असता लोकसेवक श्री जाधव यांनी तो चले गये रहेंगे,असे सांगीतले. तसेच वो, रिसीट दिया आपने? फिर यहॉ से चलन बनाके लो... असे संभाषण झाले. लोकसेवक व तक्रारदार यांच्यात पडताळणी दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये लोकसेवक श्री आनंद जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी न करता रितसर चलन भरुन त्याची रक्कम भरण्याबाबत सांगितले.

लोकसेवक श्री. आनंद जाधव यांनी सांगितल्याप्रमाणे तात्काळ आरे कॉलनी, गोरेगाव यार्ड, गोरेगाव पुर्व येथे जावून मनपा. पार्कींगमध्ये कर्तव्यावर असलेले श्री. संतोष पाथाडे यांची भेट घेवून ते लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत पडताळणी करावयाचे सर्वानुमते ठरले.

त्याप्रमाणे सर्व पथक आरे कॉलनी, गोरेगाव पूर्व, मुंबई गोरेगाव यार्ड येथे रवाना झालो. त्यावेळी १९:०० वा होते. साईबाबा कॉम्प्लेक्सजवळ गेल्यानंतर शासकीय वाहने रस्त्याच्या कडेस थांबविले. त्यावेळी २०:०० वाजले होते. आरे कॉलनी, गोरेगाव यार्ड मधील मनपा. पार्कींग लॉटची कार्यालयीन वेळ संपल्याने तेथील कार्यरत कर्मचारी हे घरी गेलेले असल्याचे समजून आले. तरी दिनांक २४/०७/२०२६ रोजीची पडताळणी कारवाई हि स्थगित करुन आता पर्यंत केलेल्या कारवाईबाबत मा. वरिष्ठांचे मार्गदर्शन घेवुन तसेच रविवारी यार्ड बंद असल्याने पुढील कारवाई सोमवार दिनांक २७/०७/२०२६ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दिनांक २३/०७/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये आलोसे देवेंद्र चंद्रकांत बांदवडकर याने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक २७/०७/२०२६ रोजी आम्ही सापळा पथक,तक्रारदार, दोन्ही पंच असे लाप्रवि कार्यालयात सापळा कारवाई कामी हजर झालो. दिनांक २७/०६/२०२६ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये यापूर्वी वापरण्यात येणारे कार्ड पून्हा सापळा कारवाई मध्ये वापरण्यात येणार असल्याने मी पोह मठपती यांना सांगुन जुने मेमरी कार्ड हजर करण्यास सांगून माझे, पंच, तक्रारदार आमचे वक्तव्य घेण्यात आले त्यावेळी १४.३८ वा होते व बंद केले त्यावेळी १४.४० वा होते.

मी व स.पो.आ.सुनिल हारुगडे यांनी पंच, तक्रारदार व पथकास सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाची दक्षता व करावयाची कारवाईबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. मी तक्रारदार यांना इसम नामे देवेंद्र यांस लाचेची रक्कम दिल्यानंतर इशारा म्हणून सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे शर्टच्या फोल्ड केलेल्या बाहया सोडतील अशी कृती करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रुपये ६,०००/- इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. ६,०००/- (त्यामध्ये रू. ५००/-

<u>फिर्यादी पोलीस निरीक्षक रेखा दुधभाते यांचा फिर्यादी जबाब पुढे चालु....</u>

दराच्या भारतीय चलनाच्या १२ नोटा) यांचे झेरॉक्स काढण्यात आलेले आहेत. त्यानंतर पो.हवा शेमडकर यांनी पंच व तक्रारदार यांना ॲन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून ॲन्थ्रासिन पावडरचा डेमो दाखविला त्यामध्ये पावडरचा रंग फिकट निळसर चकाकी दिसून आली.त्यानंतर पो.हवा शेमडकर हे पुढील सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगीतले. पो.हवा शेमडकर यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रुपये ६०००/- रक्कमेतील नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या पुढील उजव्या बाजूच्या खिशामध्ये ठेवली.

त्यानंतर मी, सपोआ हारुगडे, दोन्ही पंच, तक्रारदार व पथकातील अंमलदार सापळा कारवाईकरीता आवश्यक त्या साधन सामुग्रीसह दोन शासकिय वाहनाने १५:०० वा. लाप्रवि कार्यालयातून बाहेर पडलो. मी शासकीय वाहन चालक पोहचा.क्र.०७००९९/परुळकर व वाहन चालक पोशिक्र. १४०२५०/गाराळे यांना दोन्ही वाहने सरपोचखानवाला रोड, वरळी सी लिंक, पश्चिम द्रूतगती मार्गाने ओबेरॉय मॉलच्या दिशेने घेण्यास सांगितली. त्यावेळी १५:४५ वा. आम्ही सर्व साईबाबा कॉम्पलेक्स जवळ, मोहन गोखले रोड, गोरेगाव पूर्व, मुंबई येथे पोहंचलो.

तदनंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजूस व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच क्र. १ व इतर पोलीस अंमलदार यांचेसह इसम संतोष यांची ठरलेल्या ठिकाणी भेट घेण्यासाठी जाण्यास सांगितले व मी व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन पोह मठपती यांच्या मदतीने तक्रारदार यांच्या शर्टला अडकविण्यात आला. त्यावेळी वेळ १६:०१ वा होते. सदर सुचनेवरून तक्रारदार व पंच न.०१ व आम्ही सापळा पथक सदर ठिकाणावरुन रवाना झाले. त्यानंतर आम्ही सापळा पथक आरे कॉलनी, गोरेगाव पूर्व येथे गोरेगाव यॉर्ड, रस्त्याच्या कडेला तसेच आजूबाजूच्या ठिकाणी थांबून परिसरात पाळत ठेवून होतो.

काही वेळाने तक्रारदार हे परत आले त्यावेळी पंच क्र. १ यांच्याकडे इसम नामे देवेंद्र व तक्रारदार यांचेमध्ये झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली असता, सदर ठिकाणी इसम संतोष हे मिळून आले, त्यावेळी तक्रारदार यांनी देवेंद्र सर बाबत विचारले असता, तक्रारदार व संतोष यांचेमध्ये झालेले संभाषण **"अभी तो सर नही है, पता नही कब आयेंगे, रुको फिर आयेंगे, मिटींग मे रहेंगे वो,..कितना रुपया बोले थे, कितना रुपया बोले थे, अच्छा उस दिन बोले थे ना...तो छे हजार अच्छा है आपको दस दस हजार रुपये लेके छोड रहा हू में गाडी, ग्यारा ग्यारा हजार, मिंटीग में है सर, अभी फोन किया थे, लेकीन आयेंगे बोले... तुमको बोले छे हजार में ये करना है... तो तुम छे हजार रुपये लेके आये...पैसा लेके आये हो क्या आप.. मेरे को सात बोल रहे है, तुमको छे...आयेंगे तो में बोलता हू..**.असे संभाषण झाले त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्र. २ यांचसमक्ष विचारणा केली असता, तक्रारदार यांनी देखील पंच क्र. १ यांनी सांगितल्याप्रमाणे हकिगत सांगितली. त्यानंतर मी, पोह. मठपती यांचेमदतीने तक्रारदार यांचेकडील डिव्हिआर काढून बंद केला त्यावेळी १६.१५ वा होते.

त्यानंतर तक्रारदार यांनी पून्हा आलोसे देवेंद्र यांची भेट घेण्याकरीता तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बाजूस व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच क्र. १ व इतर पोलीस अमलदार यांचेसह आलोसे देवेंद्र यांची ठरलेल्या ठिकाणी भेट घेण्यासाठी जाण्यास सांगितले व पोह मठपती यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन तक्रारदार यांच्या शर्टला अडकविण्यात आला. त्यावेळी वेळ १७:०२ वा होते. सदर सुचनेवरून तक्रारदार व पंच न.०१ व आम्ही सापळा पथक सदर ठिकाणावरुन रवाना झाले. त्यानंतर आम्ही सापळा पथक आरे कॉलनी, गोरेगाव पूर्व गोरेगाव यॉर्ड येथे रस्त्याच्या कडेला तसेच आजूबाजूच्या ठिकाणी थांबून परिसरात पाळत ठेवून होतो. त्यानंतर काही वेळाने तक्रारदाराने सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे आलोसे संतोष यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत परिधान केलेल्या शर्टच्या फोल्ड केलेल्या बाहया सोडल्याचा इशारा केला. त्यानंतर लगेच पोशि परब, सपोआ हारुगडे व मी, पोह मठपती यांच्या मदतीने तक्रारदार यांचे शर्टास आत लावलेला रेकॉर्डर बंद करून, सापळा पथकास इशारा करून पंचासमक्ष आलोसे संतोष यास १७:४० वा. लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले.

फिर्यादी पोलीस निरीक्षक रेखा दुधभाते यांचा फिर्यादी जबाब पुढे चालु....

सदर खाजगी इसमास त्याचे पूर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव श्री. संतोष सोनू पाताडे वय ५१ वर्षे, व्यवसाय : सुपरवायझर, राठी : साई श्रध्दा बिल्डिंग, रुम. क्र. ७०६, सिध्दार्थ नगर, रोड क्र. ४, गोरेगाव पूर्व, मुंबई असे सांगितले.

तेव्हा सपोआ हारुगडे यांनी संतोष पातडे यास देवेंद्र यास फोन करून पैसे दिले बाबत कळविण्यास सांगितले. त्यावेळी मी, पोह मठपती यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू केला त्यावेळी १८:०० वा होते. संतोष पाताडे यांनी त्यांचा मोबाईल क्र. ९७६९२५४७७५ यांनी देवेंद्र यांना त्यांचा मोबाईल क्र. ९८२११७२७४७ यावर फोन केला असता त्यांनी फोन उचला नाही त्यावेळी १८.०१ वा होते.

त्यानंतर पुन्हा सपोआ हारुगडे यांनी आलोसे संतोष यास देवेंद यांना कॉल करण्यास सांगितले त्यावेळी १८:०१ वा होते. संतोष पातडे यांनी त्यांचा मोबाईल क्र. ९७६९२५४७७५ यांनी देवेंद्र यांना त्यांचा मोबाईल क्र. ९८२११७२७४७ यावर फोन केला असता त्यांनी फोन उचला नाही त्यावेळी १८.०२ वा होते.

त्यानंतर काही वेळाने आलोसे देवेंद यांनी त्यांच्या मोबाईल क्र. ९८२११७२७४७ वरुन संतोष पातडे यांच्या मोबाईल क्र. ९७६९२५४७७५ वर कॉल केला त्यावेळेस सपोआ हारुगडे यांनी सदरचा कॉल रेकॉर्ड करण्यास सांगितले त्यावेळी मी, पोह मठपती यांच्या मदतीने व्हाईस रेकॉर्ड चालू केले त्यावेळी १८.०४ वा होते. त्यानंतर आलोसे देवेंद व आलोसे संतोष यांचेमधील झालेले संभाषण ''आलोसे संतोष...एक मिनिट, आता जी गाडी आली ना, एम.एच.फोटी सेवन बी. एल., नाईन सिक्स सेवन जिरो व्हॅगनार, सहा हजार घेतली आणि सोडली आहे...आलोसे देवेंद्र... हा ते ते ठिक आहे'' असा प्रतिसाद दिल्याबाबत संभाषण झाले त्यानंतर मी, पोह. मठपती यांचेमदतीने तक्रारदार यांचेकडील डिव्हिआर बंद केला त्यावेळी १८:०५ वा होते.

त्यानंतर आलोसे संतोष पाताडे यांनी आरे कॉलनी गोरेगाव यॉर्ड येथील कॅन्टेनरमधेच शासकिय मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण सुरू करून, कॅन्टेनर मधील दिवे बंद करून, दोन पंचासमक्ष आलोसे संतोष पाताडे याचे हाताची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता संतोष पाताडे याचे दोन्ही हाताच्या पेरांना ॲन्थ्रोसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसून आली. तसेच पॅटचे उजव्या बाजूच्या खिशातील काळया रंगाच्या पाकिटात ॲन्थ्रोसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसून आली. आलोसे संतोष पातडे याचेकडुन हस्तगत रक्कम रूपये ६०००/- रु वर ॲन्थ्रोसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसून आली. लाच रक्कमेच्या नोंटावरील नंबर पडताळुन पाहिले असता ते सापळा कारवाई कामी वापरण्यात आलेल्या नोटांचेच असल्याचे दिसुन आले. तसेच तक्रारदार यांची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता तक्रारदार यांच्या हातास व पॅन्टच्या पुढील उजव्या खिशास ॲन्थ्रोसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसून आली. सपोआ हारुगडे यांनी आलोसे संतोष यांचेकडे देवेंद्रबाबत विचारणा केली असता, त्यांने देवेंद्र हा एकता सुप्रभात, रोड १६ येथील ऑफिस मध्ये असल्याचे सांगितले. त्यानंतर लागलीच माझेसोबत असलेल्या सापळा पथकाचे दुसरे टिमने आलोसे देवेंद्र यांना एकता सुप्रभात, सिध्दार्थ नगर, रोड क्र. १६, गोरेगाव पूर्व, मुंबई येथून ताब्यात घेतले. त्यावेळी १९:३० वा होते. त्यावेळी देवेंद्र यास त्याचे पूर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव श्री. देवेंद्र चंद्रकात बांदवडकर, वय ५२ वर्षे, व्यवसाय - समन्वय अधिकारी, राठी : बी/४०१, कृष्णामाई हौ सोसा, तुरेल पाखाडी रोड, मालाड पश्चित, मुंबई .मो.क्र. ९८२११७२७४७ असे सांगितले.

उर्वरीत कार्यवाहीकरीता आम्ही सर्व ताब्यात घेतलेल्या अंगझडतीतील चिजवस्तू व आलोसे संतोष यांचेसह लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर सापळापुर्व व सापळा पंचनामा तयार करण्यात आला.

त्यांनतर सपोआ हारुगडे व पथक हे आलोसे देवेंद्र बांदवडकर यांना घेवून गोरेगाव पोलीस ठाणे, मुंबई येथे जावून आलोसे संतोष पाताडे, देवेंद्र चंद्रकांत बांदवडकर तसेच इतर दोन इसमास चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले असून, त्यांना पूढील चौकशीकामी लाप्रवि, मुंबई येथे घेवून जात असल्याबाबत नोंद घेण्यात आली.

तरी यांतील तक्रारदार मोहम्मद फारुक मोहम्मद सऊद खान यांचे मालकीची मारुती सुझकी वॅगनार मोटार कार ही बृहन्मुंबई महानगर पालिकेकडुन दिनांक १४/०७/२०२६ रोजी टोईंग करण्यात आली होती सदर मो/वाहन सोडविण्याकरीता श्री देवेंद्र यांने तक्रारदार यांचेकडे रु. १०,७००/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली होती. दिनांक २३/०७/२०२६ रोजी पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचेकडे खाजगी इसम देवेंद्र बांदवडकर यांनी बी.एम.सी ला पैसे द्यावे लागतात असे सांगून तडजोडती अंती रु. ६०००/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी केली. त्यानंतर दिनांक २७/०७/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी खाजगी इसम देवेंद्र बांदवडकर यांच्या वतीने खाजगी इसम संतोष पाताडे यांनी रु. ६०००/- इतकी रक्कम शासकीय पावती न देता तक्रारदार यांचेकडून लाच म्हणुन पंचासमक्ष स्वीकारली म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्याकरिता फिर्याद आहे.

माझा वरील जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( सुनिल हारुगडे )
सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई

हा जबाब दिला

PI दुधभाते

...राने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ सापळा कारवाईनंतर दाखल
...sons for delay in reporting by the complainant/informant

...स गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
...rticulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

...) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —
Total Value of properties stolen / involved

...) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

...कस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........
...nnatural / Accidental Death Case No., if any. —

...हिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

...irst Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील आरोपी लोकसेवक हे प्रदिप ट्रेडिंग कंपनी अंतर्गत काम करत असून कंपनीचे बी.एम.सी. चे कॉन्ट्रक्टर आहे. BMC कंपनीला पेमेंट देते व कंपनी लोकसेवकास [illegible] देते. यातील नमुद लोकसेवकाने तक्रारदार यांच्या ड्राइनावरिल दंड भरून न देता त्यांच्याकडून रु. 6,000/- रु. लाचेची मागणी आलोसे क्र. (2) यांनी आलोसे क्र. (1) यांना स्विकारण्यास सांगितली त्याप्रमाणे आलोसे (1) यांनी सदरची रक्कम अर्जदार यांना पावती न देता स्विकारली आहे. म्हणून त्यांचेविरुध्द फिर्याद देत आहे.

**केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या
तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........ स.पो.आ. श्री. दयानंद सावंत

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ...........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........

(3) Transferred to P. S. ........
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ सुनिल हाडगे
पदनाम Rank ........ सहा. पोलीस आयुक्त, मुंबई
तपासिक अ. चा कोड क्र. ........ भा.प्र.वि. मुंबई
Posting

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........ 28/07/2026
1. Date and time of submitted to the Court.

Code No. of I. O. ........

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report